प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्याबाबत..........

महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग,
शासन निर्णय क्र. गोपनि २०१९/प्र.क्र. ०७ /का.१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

भारतीय प्रशासकीय सेवा (भा.प्र.से./भा.व.से. व भा.पो.से.) तसेच राज्यातील इतर सर्व सेवांकरिता गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन करण्यासंदर्भात प्रत्येक विभागाने शासन निर्णय निर्गमित करुन प्रतिवेन/पुनर्विलोकन अधिकारी विहित करण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या आहेत. या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद या क्षेत्रिय कार्यालयाच्या आस्थापनेवर सदस्यांची २ पदे मंजूर आहेत. सदर २ पदांपैकी एका पदावर “राज्य नागरी सेवेतील अधिकारी व असा अधिकारी उपलब्ध नसल्यास समकक्ष दर्जाचा शासकीय अधिकारी” व दुसऱ्या पदावर “ मुस्लीम कायदा व विधितत्वमीमांसाचे ज्ञान असणारी व्यक्ती” अशा उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जाते. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद या क्षेत्रिय कार्यालयाच्या “सदस्य” पदावर कार्यरत असणाऱ्या उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन कोणी करावयाचे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आता या शासन निर्णयान्वये या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद या क्षेत्रिय कार्यालयाच्या आस्थापनेवर “सदस्य” पदावर कार्यरत असणाऱ्या उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यासाठी “अध्यक्ष ,महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण,औरंगाबाद” यांना “प्रतिवेदन अधिकारी” तर “अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग)” यांना “पुनर्विलोकन अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन इत्यादीबाबतची कार्यवाही शासनाच्या गोपनीय अहवालासंदर्भातील सर्व प्रचलित शासन नियमानुसार करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२२११४०३१७११४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.02.22 11:42:20 +05'30'

(सं.छ.तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद
३. सह सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
४. अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. कक्ष अधिकारी (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. सदस्य, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद
७. निवड नस्ती (का.१)